राज्यातील कत्तलखान्यांच्या संचालनासंदर्भात गठीत राज्यस्तरीय समितीमध्ये राज्य प्राणी कल्याण मंडळाच्या प्रतिनिधीची सदस्य म्हणून नेमणूक करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमयुएम-२०१६/प्र.क्र.६१७/नवि-१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २९ जून, २०१९

वाचा :- १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१४७/नवि-२०, दि.२३.१०.२०१२.
२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. पविआ-१०१४ प्र.क्र.४६३/पदुम-३, दि.३०.०६.२०१७.
३) महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळाच्या दि.११.१०.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:

मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र.३०९/२००३, लक्ष्मीनारायण मोदी विरुध्द भारत सरकार या याचिकेच्या अनुषंगाने दिनांक २३.०८.२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासन निर्णय दि.२३.१०.२०१२ अन्वये कत्तलखान्यांच्या संचालनासंदर्भात राज्यस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आहे. सदर समितीमध्ये राज्य प्राणी कल्याण मंडळाने शिफारस केलेला राज्य प्राणी कल्याण मंडळाचा प्रतिनिधी सदस्य आहे. दरम्यान कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दि.३०.०६.२०१७ अन्वये राज्यातील प्राणी कल्याण कायद्याचे संनियंत्रण करण्यासाठी पुनर्रचित करण्यात आलेल्या महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळावर उपाध्यक्ष व अशासकीय सदस्यांची नियुक्ती केलेली आहे. राज्य प्राणी कल्याण मंडळाने दि.११.१०.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावान्वये राज्यातील कत्तलखान्यांच्या संचालनासंदर्भात गठीत राज्यस्तरीय समितीमध्ये राज्य प्राणी कल्याण मंडळाचा प्रतिनिधी म्हणून ॲड. सिध्द विद्या यांची सदस्यपदी नियुक्ती करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

शासन निर्णय:

राज्यातील कत्तलखान्यांच्या संचालनासंदर्भात गठीत राज्यस्तरीय समितीमध्ये राज्य प्राणी कल्याण मंडळाचा प्रतिनिधी म्हणून ॲड. सिध्द विद्या यांची सदस्यपदी नेमणूक करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२९१५११२०६४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=22804d8f98c03e9a67ca8eca6a02e7eaab4bcc4a3d59dfce4f1c7189ab74b085, serialNumber=e83c1c73de120837488d76379734db4868992e2b35ba1df8cfea9650fcff780f, cn=Kailas Madhukar Badhan
Date: 2019.06.29 15:14:43 +05'30'

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधापरिषद, विधानभवन, मुंबई.
४. मा. सर्व विधानमंडळ सदस्य
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
१२.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१३.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, पुणे.
१४.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१६.सर्व विभागीय आयुक्त.
१७.सर्व जिल्हाधिकारी.
१८. ॲड. सिध्द विद्या, सदस्य, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ,
१९.निवडनस्ती (नवि-१७).